<u>नियमित दिवाणी दावा क्र. १२०/२०१८ मध्ये निशाणी क्र. ४२ खालील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज हा, वादी यांनी, दाव्यात दुरुस्ती करण्यासाठी परवानगी मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. वादींचे असे कथन आहे की, त्यांनी दावा वाटपाकरीता दाखल केला आहे. दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र.१ हे दि. १४.०७.२०२४ रोजी मयत झालेले आहेत. सदर प्रतिवादी क्र.१ यास वादी क्र.१ आदित्य दत्तात्रय शिवशरण-मुलगा व वादी क्र. २ आम्रपाली दत्तात्रय शिवशरण-पत्नी यांच्याशिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. त्यामुळे, सदर मयत प्रतिवादी क्र.१ दत्तात्रय नायकू शिवशरण यांचे नावासमोर मयत लिहून सरनाम्यातून कमी करण्यात यावी, अशी दुरुस्ती करण्यास विनंती केली आहे.

३. दाव्याचे अवलोकन केले. प्रतिवादी क्र. १, २, ४ व ५ यांच्याविरुध्द दावा एकतर्फा व प्रतिवादी क्र. ३, ६ व ७ यांच्याविरुध्द दावा विना कैफियत चालविण्यात आला. प्रतिवादी क्र. ३,६ व ७ यांनी प्रस्तुत अर्जास त्यांचे म्हणणे दाखल न केल्याने, अर्ज त्यांच्या म्हणण्याविना चालविण्यात आला.

४. वादीच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

५. वादीने प्रस्तुतचा दावा वाटपाकरीता दाखल केलेला आहे. दाव्याचे अवलोकन केले असता, वादी क्र.१ हा प्रतिवादी क्र.१ चा मुलगा असून, वादी क्र. २ ही त्यांची पत्नी आहे. वादीच्या कथनानुसार, प्रतिवादी क्र.१ हे दि. १४.०७.२०२४ रोजी मयत झालेले आहेत व त्यांना प्रस्तुत वादीशिवाय इतर कोणीही वारस नाहीत. त्यामुळे, प्रतिवादी क्र.१ च्या नावापुढे मयत असा उल्लेख करुन, त्यांना दाव्यातून वगळणे आवश्यक असल्याचे दिसून येते. सदर दुरुस्तीमुळे प्रतिवादींचे काहीएक नुकसान होणार नाही, तर दावा गुणदोषावर निकाली करण्याकरीता, प्रस्तावित दुरुस्ती मंजुर करणे न्यायोचित्त होईल. सबब, खालील आदेश पारीत करणे न्यायाच्या दृष्टीने योग्य होईल.

<u>आदेश</u>

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. वादी यांनी नियमानुसार १४ दिवसांच्या आत, प्रस्तुत अर्जात मागितल्याप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करुन, दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

PATIL VRUSHALI KISANRAO

Digitally signed by PATIL VRUSHALI KISANRAO
Date: 2025.09.10 18:04:55 +0530

(व्ही.के. पाटील)

दिनांक : १०/०९/२०२५

दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मंगळवेढा.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Order are same word to word as per the original Order.

(a) Name of the Stenographer : S.M. Gaddam

(b) Court : Civil Judge Jr. Div., Mangalwedha.

(c) Date of Order : 10-09-2025

(d) Order uploaded on : 10-09-2025